(२०५) 201504221706176127

माहेगाव देशमुख (ता.कोपरगाव जि.अहमदनगर) कोल्हापूर पध्दतीचा बंधारा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र.कोपबं १७९४/(५०५/९४) [illegible]
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १९/६/२००७

पहावे : १) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांचे दिनांक ३.१०.९४ चे पत्र क्र.उमप्र/तां-४/कोपबं-३/५४१९/सन १९९४

२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांचे दिनांक ०१.३.२००७ चे पत्र क्र.उमप्र/तां-२/११८०/सन २००७

प्रस्तावना :-

माहेगांव देशमुख या योजनेस शासन निर्णय क्रमांक कापब/२४८९/३०५३/८३१/८९, लपा-१ दिनांक ४.१.१९९० च्या आदेशान्वये रुपये ७८,६८,५५६/- किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानंतर माहेगांव देशमुख कोल्हापूर पध्दतीचा बंधारा ता.कोपरगाव जि.अहमदनगर या योजनेस शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र.कोपबं २७९१/७५८/(२२६/९१) लपा-२, दिनांक १७.७.१९९१ अन्वये एकूण रुपये १,३१,५६,५६०/- रकमेस नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

सदर बंधा-याचे काम कोपरगाव सहकारी साखर कारखाना व जलसंपदा विभाग यांच्यात झालेल्या करारानुसार सन पूर्ण करण्यात आले आहे.

करारानुसार बंधा-यावर सध्या कारखान्याची मालकी असून कारखान्याची देय रक्कम दिल्यानंतर मालकी शासनाची राहील. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांच्याकडून सन १९९३-९४ च्या दरसूचीवर आधारित एकूण रुपये २६२.२३ लक्ष एवढ्या किंमतीचा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव प्राप्त झाला होता व तो शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

माहेगांव देशमुख कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, ता.कोपरगांव जि.अहमदनगर या योजनेस सन ९३-९४ वर्षाच्या दरसूचीवर आधारित केलेल्या प्राक्कलनानुसार कामाच्या अंदाजित रुपये २,२४,६६,८१४/- (रुपये दोन कोटी चोवीस लक्ष सहासष्ट हजार आठशे चौदा फक्त) त्यापैकी रुपये १,७९,४४,०६७/- कामापोटी व रुपये ४५,२२,७४७/- अनुषंगिक खर्च) रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अंदाजपत्रकाचा गोषवारा सोबत जोडलेल्या विवरणपत्रात देण्यात आला आहे.

२. या योजनेच्या कामावरील खर्च मुख्य लेखाशीर्ष ४७०२ लहान पाटबंधा-यावरील भांडवली खर्च पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका (चार) महाराष्ट्र गोदावरी

मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान या शीर्षाखाली खर्ची टाकावा व गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ २३६ १४६१ / दिनांक ३० ४ २००७ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २६५ / व्यय-१२ / दिनांक १६ ५ २००७ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. या योजनेस प्रदान केलेली सुधारित प्रशासकीय मान्यता अनुक्रमांक [illegible] आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(ग च दुसाणे)
शासनाचे अवर सचिव

प्रतिलिपी अंदाजाच्या गोषवा-यासह :-

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक
मुख्य अभियंता (दक्षप) व सहसचिव, मंत्रालय, मुंबई
आंतर वित्त सल्लागार व उपसचिव, मंत्रालय, मुंबई
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, [illegible]
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्रमांक [illegible], [illegible]
उपसचिव (लघु पाटबंधारे) / अवर सचिव (खारभूमी), मंत्रालय, मुंबई
उपअभियंता (खारभूमी) मंत्रालय, मुंबई
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नाशिक
अर्थशाखा (३ प्रती) / लपा-१ / लपा-२ / निवस-२ / जलसंपदा विभाग,
जिल्हाधिकारी, अहमदनगर
स्वीय सहायक, मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, राज्यमंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
खारभूमी कार्यासन, संग्रहार्थ

तावा व गंटावा

२००७ व कि

हमतीने निर्गमि

आले आहे

१)

सचिव

दिनांक ५/६/२००७ च्या शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्रमांक कोपर्गा २००४/(१००/९४) खारथूमी चे सहपत्र)

माहेगांव देशमुख को.प.बंधारा, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर

अंदाजपत्रकाचा गोषवारा

अ.क्र.	उपशीर्ष	प्रस्तावित तरतूद (रु.लक्ष)
१)	ए-प्राथमिक	---
२)	बी-भूसंपादन	२४,२००/-
३)	सी-कामे	१,७२,७२,३१८/-
४)	के-इमारती	१,००,०००/-
५)	ओ-संकीर्ण	२९,१००/-
६)	पी-परिरक्षण	५२,७२१/-
७)	आर-दळणवळण	१,५७,०४२/-
	कामाप्रित्यर्थ एकूण रुपये	१,७३,४४०,६७/-
	अधिक अनुषंगिक खर्च २५.२५ टक्के या दराने (भूसंपादन वगळून)	४१,२२,७४७/-
	एकूण रुपये	२,२४,६६,८४४/-

ठळक वैशिष्टये

१) नियोजित पाणीसाठा	६८६५ स.घ.मी.
२) पाणीसाठयाची प्रती स.घ.मी किंमत	३२७३ < १८२५०
३) लाभव्यय गुणोत्तर	६.२१ > १.००
४) सिंचन क्षेत्र	१६६१ हेक्टर